# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 08/02/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कुही :- अंतर्गत 15 कि. मी. मौजा डोडमा येथे दिनांक 05/02/2021 ते दिनांक 06/02/2021 चे रात्री दरम्यान कश्यप विक्रम गजभिये (मृतक) वय 47 वर्ष रा धानला, पोस्ट गोन्हा, ता कुही हा फिर्यादी नामे- ईश्वर दामाजी गजभिये, वय 65 वर्षे, रा. आकोली, ता. कुही यांच्या कडे मिस्त्री कामाकरीता आला होता. त्याचे राहणे व जेवना करणे हे फिर्यादीकडेच होते. मृतक व फिर्यादी हे सोबत गावामध्ये जाउन घराचे बांधकाम करीत होते. दि. 26/01/2021 रोजी फिर्यादीने मृतकला त्याच्या रोजीचे पैसे दिले. तेव्हापासुन मृतक हा कामावर आला नाही. घटना तारखेला फिर्यादीला फोन आला कि, ''कुही पाचगाव रोडवरील डोडमा शिवारात कश्यप गजभिये हा मृत अवस्थेत पडलेला आहे.'' सदर मृतक हा कामानिमित्य आपल्या मोटार सायकलने कुही वरून पाचगाव रोड ने जात असता वाहनावरील अचानक नियंत्रण सुटल्याने रोडच्या बाजुला पडुन डोक्याला गंभीररित्या मार लागल्याने तो मरण पावला.

सदर प्रकरणी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ विकास दहीकर 9423406303 हे करीत आहे.

### पाण्यात बुडुन मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :- दिनांक 07/02/2021 चे 15.30 वा. दरम्यान राजेश गंगाराम मुंदाफळे (मृतक), वय 33 वर्ष, रा. बिनाकी मंगळवारी मेहंदीबाग नागपूर हा आपले काम करणाऱ्या मित्रासह महादेव मंदीर घोगरा येथे फिरायला गेला होता. दरम्यान पेंच नदीच्या पाण्यात राजेश मुंदाफळे हा आंघोळ करित असतांना त्याचा पाण्यात बुडुन मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- राजेन्द्र शामराव पवार, वय 45 वर्ष, रा. जरीपटका मिसाळ ले आउट रंगारी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा दिलीप बासोडे 9823083905 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर